**फौजदारी चौकशी अर्ज क.३३७/२०१७ मधील नि.१ वरील आदेश**

श्री.हेमंत वामन तरे ... अर्जदार

वि.

ग्राम विकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत शेलू,
ता.कर्जत, जि.रायगड. .... सामनेवाला.

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराचे आजोबा कै.जैतू राघो तरे हे दिनांक १५/०४/१९७२ रोजी शेलू, ता.कर्जत, जि.रायगड येथे मयत झालेबाबत नोंद करणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, अर्जदारास त्याच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत शेलू, ता.कर्जत, जि.रायगड येथे करण्याची अनावधानाने राहून गेली आहे. अर्जदारास कै.जैतू राघो तरे यांच्या मृत्यू दाखल्याची आवश्यकता खाजगी कामाकरीता आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने त्याच्या कथनाप्रित्यर्थ शपथपत्र (नि.१०) दाखल केले आहे. अर्जदाराने अर्जासोबत ग्रुप ग्रामपंचायत शेलू यांनी दिलेला दाखला (नि.११) व अर्जदाराच्या आधार कार्ड व शिधापत्रिकेची पडताळलेली प्रत, इ. कागद दाखल केले आहेत. “ दैनिक मुंबई तरूण भारत” या वर्तमानपत्रातील जाहीर नोटीस दिनांक ०९/०१/२०१८ (नि.१२) सादर केली आहे.

४. अर्जदाराच्या शपथपत्रातील मजकूर त्यांचे अर्जातील कथनांचा पुर्नु:च्चार आहे. “ दैनिक मुंबई तरूण भारत” या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस देवून देखील एक महिन्याच्या कालावधीपर्यंत त्याला कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या कथनाला पुष्टी मिळते. अर्जदाराचा अर्ज विनाआव्हानित राहिला आहे. त्यामुळे अर्जदाराच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद ग्रुप

ग्रामपंचायत शेलू, ता.कर्जत, जि.रायगड येथे करण्यास ते पात्र आहे. करिता आदेश

## **आदेश**

१. अर्ज मंजूर.

२. कै.जैतू राघो तरे यांचा मृत्यू दिनांक १५/०४/१९७२ रोजी शेलू, ता.कर्जत, जि.रायगड येथे झाला असल्याने तशी नोंद करणेबाबत ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत शेलू, ता.कर्जत, जि.रायगड यांना आदेश देणेत येत आहे.

कर्जत (श्र.जि. डोलारे)

दिनांक :१२/०६/२०१८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत

जिल्हा-रायगड.

फिर्याद वाचली, कागदपत्रे पाहीली, फिर्यादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. फौ.प्र.सं. कलम २०२ चा अहवाल वाचला.

फिर्यादमधील कथनाप्रमाणे मौजे बांधिवली, ता.कर्जत येथील स.नं.८० /२अ/१ पैकी ६ आर मिळकत त्यांनी सरफराज अहमद सिध्दिकी व सखाराम पांडूरंग विले यांचे सोबत सामायिकरित्या मुक्ताबाई सिताराम निमणे यांचेकडून दि.६.०४.२०१३ रोजी खरेदी केली होती. त्यापैकी वर नमुद मिळकतीचा ताबा फिर्यादीकडे मालकीहक्काने आहे. स.नं.८०/२अ/१ पैकी १० आर ७० प्रती ही मिळकत सरफराज अहमद सिध्दीकी व सखाराम विले यांनी दि.२३.७.२०१५ रोजी बाळू शांताराम निमणे व प्रेमा शंकर निमणे यांना खरेदी दिली.

फिर्यादी तीचे वर नमुद मिळकतीत ऑक्टोबर २०१५ रोजी केली असता आरोपी तेथे अतिक्रमण करून बांधकाम करीत असल्याचे दिसले. म्हणून फिर्यादीने ग्रुप ग्रामपंचायत शेळू येथे त्याबाबत तक्रार दिली तसेच पोलिस स्अेशनला फिर्याद दिली. आरोपीने खोटे व बनावट दस्त करून फिर्यादीची दिशाभूल केल्याने फिर्याद दाखल केले.

माझे पूर्व पिठासन अधिका–यांनी नि.१ वरील आदेशाने प्रकरण फौ.प्र.सं कलम २०२ अन्वये तपासकरीता पाठविले. तपास अधिका–यांनी त्यांचा अहवाल नि.६ खाली दाखल केला परंतू तपास अधिका–यांनी केवळ फिर्यादी व आरोपीचा जबाब नोंदवून अहवाल दाखल केला आहे. या व्यतीरीक्त कोणत्या कागदपत्रांची आरोपीने फसवणूक केली याची कोणतीही माहीती अथवा शहानिशा तपास अधिका–यांनी तपासा दरम्यान केलेली नाही.

फिर्यादीतर्फे नि ..... खाली त्यांचेम्हणणे व युक्तीवाद दाखल केला. त्यासोबतचे यादीमध्ये दि.२६.१०.२०१७ चा सहीतज्ञांचा अहवाल व रे.दि.मु नं.४० /१५ मधील नि.५ वरील आदेशाची छायांकित प्रत दाखल केली आहे. फिर्यादीतर्फे

...२...

विवादीत दस्त ऐवजावरील तीची सही नाकारली आहे.

आरोपीचे जबाबाप्रमाणे सन २००७ मध्ये त्याने मौजे बांदिवली येथे ३ गुंठे जमिन खरेदी केली होती. त्यानंतर या जागेची मुक्तबाई सिताराम निमणे यांचेकडून सन २०१३ मध्ये नोटरी करून घेतली. फिर्यादी, सखाराम विले व सरफराज अहमद सिध्दिकी यांनी स.नं.८०/२अ/१ क्षेत्र १६.७० आर पैकी १२आर क्षेत्र खरेदी केली आहे. त्यापैकी १०आर क्षेत्र सन २०१५ मध्ये बाळू शांताराम निमणे व प्रेमा शंकर निमणे यांना खरेदी दिली आहे. उर्वरीत ४.७० आर पैकी ३आर क्षेत्र आरोपीने सन २०१३ मध्ये नोटरी करून घेतली आहे. तसेच उर्वरीत १.७० आर क्षेत्र मुक्तबाई सिताराम निमणे यांचे नांवे आहे. आरोपीने त्याचे नांवे असलेल्या जागी सन २००९ मध्ये शेलू ग्रामपंचायतीची परवानगी घेवून घर बांधले आहे.

तपासी अधिका-यांनी त्यांचे अहवालासोबत विविध दस्तऐवज दाखल केले आहे. आरोपीने त्याचे जबाबात ज्या सन २०१३ चे कराराचा उल्लेख केला त्याचे छायांकित प्रतीमध्ये फिर्यादी व सखाराम पांडूरंग विले, सरफराज अहमद सिध्दीकी यांचे लिहून देणार म्हणून सहया आहेत. या दस्तावरील सही फिर्यादीने नाकारली आहे. फिर्यादीतर्फे नि. .... /१ खालील सहीतज्ञाचे अहवालाप्रमाणे करारावरील सही व फिर्यादीचे खरेदीपत्रावरील दि.८.४.२०१३ व ५.८.२०१५ चे खरेदीपत्रावरील सहया जुळत नाहीत. या अहवालवर भिस्त ठेवून फिर्यादीतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, आरोपीने फिर्यादीच्या खोटया सहया करून बनावट दस्त तयार केला आहे परंतू तपासी अधिका-यांनी तपासादरम्यान या बाबीवर प्रकाशझोत टाकला नाही.

फिर्यादीचे कथन पहाता आरोपीने कोणत्या दस्तऐवजाचे बनावटीकरण केले ते दस्त समोर येणे आवश्यक आहेत. परंतू तपासी अधिका-यांनी अपूर्ण तपास केल्याचे दिसत आहे त्यामुळे तपासी अधिका-यांनी यादृष्टीने पुन्हा तपास करणे गरजेचे आहे त्याखेरीज प्रकरण पुढे चालविणे इष्ट होणार नाही. करीता आदेश.



**आदेश**

१. तपासी अधिका-यांना असे निर्देष देण्यात येत आहेत की त्यांनी वादातील दस्तऐवजाचे अनुशंगाने उर्वरीत तपास पुन्हा करून त्यांचा अहवाल आदेश तारखे पासून २ महिन्याचे मुदतीत दाखल करावा.

२. तपसी अधिका-यांनी मुदतीत अहवाल दाखल न केल्यास कायदेशिर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

कर्जत (श्र.जि. डोलारे)

दिनांक : ०५/०६/२०१८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत

जिल्हा-रायगड.